## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

**अपिल क्रमांक : के.आर- २२२७/२०२६**

**अपिल क्रमांक : के.आर- २२३०/२०२६**

**अपिलार्थी, श्री.मारुती काशिनाथ ढोले,**
मु.पो.मणेरे, ता.जुन्नर, जि.पुणे ४१० ५०२.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, अनधिकृत बांधकाम विभाग,
१/अ प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली
महानगरपालिका कल्याण, शंकरराव चौक,
कल्याण (प.), जि.ठाणे ४२१ ३०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी, अनधिकृत बांधकाम विभाग,
१/अ प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली
महानगरपालिका कल्याण, शंकरराव चौक,
कल्याण (प.), जि.ठाणे ४२१ ३०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २२.०९.२०२६**

| अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | के.आर- २२२७/२०२६ | २९.०१.२०२६ | -- | २३.०२.२०२६ | -- |
| २ | के.आर- २२३०/२०२६ | २३.०२.२०२६ | -- | २७.०३.२०२६ | -- |

अपिलार्थी यांनी दि. २२.०५.२०२६ रोजीच्या दोन अर्जान्वये *"दिशाभूल करुन मी केलेल्या अर्जाबद्दल कोणतीही माहिती दिलेली नाही."* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये दोन व्दितीय अपिल अर्ज दाखल केले आहेत. सदर द्वितीय अपिलांवर आज दिनांक २२.०९.२०२६ रोजी एकत्रित सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्रीम.अनिता वि.राठोड, प्र.सहाय्यक आयुक्त, ६अ" प्रभाग क्षेत्र कार्यायल, कल्याण डोंबिवली महानगरपालिका तसेच जन माहिती अधिकारी श्री.शंकर ना.जाधव, अधीक्षक, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दोन मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

| अ. क्र. | द्वितीय अपील क्र. | माहिती अर्ज विषय |
|---|---|---|
| १ | २२२७/२०२६ | मौजे मांडा टिटवाळा (प) येथील सि.सन २५ ते २८ व ९९१ या भुखंडावरील गणेश दर्शन अपार्टमेंट आहे सदर अपार्टमेंट मध्ये ४ गावे आहेत १अ हा गाव आपल्या क.डो.महानगरपालिकेच्या नकाशामध्ये नाही पण त्या अपार्टमेंट मध्ये आहे यावर आपण काय कारवाई करणार त्यांची माहिती सही शिक्यासहीत नक्कल देण्यात यावी व इतर माहिती. |
| २ | २२३०/२०२६ | दि.१०.१२.२०२५ ते २३.०२.२०२६ पर्यंत १.सदर गाळा क्र.१अ यास आपण दि.१०.१२.२०२५ रोजी जे पत्र पाठवले त्यावर आता पर्यंत आपल्या ऑफीस संबंधित व्यक्तीने काही माहिती किंवा पत्र व्यवहार केला असेल तर तो आपल्या सही शिक्यासहीत नस्ती देण्यात यावी व इतर माहिती. |

तद्नंतर दि.२३.०२.२०२६ व दि.२७.०३.२०२६ रोजी अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील सादर केले आहेत.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आजच्या सुनावणी दरम्यान द्वितीय अपील क्रमांक के.आर.२२२७/२०२६ व के.आर.२२३०/२०२६ या दोनही प्रकरणांमध्ये माहिती दिली आहे. अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली असल्यामुळे, सदर प्रकरणी पुढील कार्यवाहीची आवश्यकता नाही. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक के.आर.२२२७/२०२६ व के.आर.२२३०/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ सप्टेंबर, २०२६ .

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ